नियमित दिवाणी दावा १८/२०२२
शलमोहन डेव्हीड काळे वि. सुनिल शामराव गायकवाड

नि.नं. २१ /लगत / सी

**<u>वादी तर्फे श्री.सी. व्ही. माजगावकर वकील यांच्या मार्फत उलटतपास शपथेवर सुरु,</u>**

१६. माझे शिक्षण एस. एस.सी पर्यंत झालेले आहे. माझे प्राथमिक शिक्षण कोडोली मध्ये व दहावी पर्यंतचे शिक्षण इस्लामपूर येथे झालेल आहे. दाव्यातील सर्व कागदपत्रे मी वाचून पाहिलेली आहेत. माझे मूळ गाव कोडोली हेच आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी व वादी एकाच समाजातील आहोत. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर व वादीचे घर समोरासमोर आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या कुटुंबाला मी चांगल्या प्रकारे ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, वादी व माझी शेत जमीन शेजारी शेजारी आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांनी खरेदी केलेल्या जमिनीच्या शेजारी वादी यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी यांच्या वडिलांचे चुलत भाऊ सुमित्र कृष्णा काळे हे मयत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सुमित्र कृष्णा काळे यांच्याकडून वादी यांच्या वडिलांनी जमीन विकत घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, मूळ दावा जमिनीचा सर्वे क्रमांक १८०/१९/ अ असा आहे. दावा जमिनीचा एकत्रीकरण योजनेनंतर गट क्र. ६७६ झाला किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. दावा मिळकतीच्या सदरी वादीचे आजोबा लक्ष्मण धोंडी ख्रिस्ती काळे वादीचे चुलते आनंदा लक्ष्मण ख्रिस्ती व वादीचे चुलत चुलते सुमित्र लक्ष्मण काळे यांचे नाव महसूल सदरी नोंद आहे किंवा कसे याबाबत मला माहिती नाही.

**<u>उलटतपास वकिलांच्या विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकूब</u>**

**सही/–**

दि. ०९/१०/२०२५. **( के. दि. काकतकर )**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पन्हाळा